# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/०५/२०१८
## दि.१७/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १०८/१८,भादविक ३२६,१४३,१४४,१४७,१४८,महाराष्ट्र पोलीस अधि. ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | ऋषीकेश बागुल,वय-२०,रा.कामगार पुतळा,शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात ते आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०५/२०१८ रोजी ०३/०० वा. ढेंगळे पुल,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे ओळखीचे असुन,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचा भाऊ अतिश बागुल यांस मोबाईलचे कारणावरुन हाताने मारहाण केली होती. त्याचा जाब सदर इसमांना विचारल्याचे कारणावरुन त्यांनी बेकायदेशीर जमाव जमवुन,फिर्यादीस लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,चाकुने त्यांचे हाताचे बोटावर वार करुन गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गिरी ९४०३६२०२६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३४१/१८,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | लिलाधर वराडे,वय-५३ वर्षे,रा.पुर्णानगर,चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | मे.रतन पॉवर प्रेसेस प्रा.लि.कंपनीचे संचालक एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑगस्ट २०12 महीन्याचा दुसरा आठवडा ते आजपर्यंत सप्तसतीज मेटाटेक प्रा.लिमी. गट नं.८७९,सिध्दीविनायक इंडिस्ट्रीअल इस्टेट,कुदळवाडी ,चिखली,पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना सप्तसतीज मेटाटेक प्रा.लिमी. कंपनीसाठी सन-२०१२ मध्ये लागणारी मशिन ही रतन मेक प्रेस ८०० टन ही खरेदी करण्यासाठी लागणारी सर्व रक्कम ही पुर्णपणे यातील नमुद मे.रतन पॉवर प्रेसेस प्रा.लि.कंपनीचे संचालक यांना विश्वासाने देवुन सुध्दा त्यांनी आपसात संगतमत करुन,फिर्यादी यांची रतन मेक प्रेस ८०० टन ही मशीन न देता त्यांची एकुण १ कोटी ५० लाख ९८ हजार ९३६ रुपयांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.एम.भोये ९९६९४२९७२८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ३४७/१८,भादविक ३०९ |
| **फिर्यादी** | रविंद्र कन्हेर,पोलीस हवालदार, पिंपरी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अविनाश ऊर्फ अभय अरविंद कोकाटे,वय-३२ वर्षे,रा.५७/४५०,संत तुकाराम नगर,पिंपरी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०१८ रोजी १९/३० वा. ५७/४५०,संत तुकाराम नगर,पिंपरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी त्याचे राहते घराचे बाहेर अज्ञात कारणावरून,कोणतेतरी विषारी औषध प्राशन करून,आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घुगे ९४०३०३१८८९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४४४/१८,भादविक ३५३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | आर.एम.केगार, पो.उप-निरीक्षक, वाकड पो.स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | १.एक महिला,रा.पिंपळे सौदागर,पुणे २.एक मोबाईधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी रात्रे १८/१० वा. थेरगाव पोलीस चौकी,थेरगाव,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद महिला हिचे मुलास वाकड पो स्टे गुन्हा रजि.नं.१३०/२०१,भादविक ३२६,३२३, ५०४,५०६,३४ प्रमाणे अटक असल्याचे कारणावरून सदर महिलेने फिर्यादी यांना अर्वाच्च भाषा वापरून,उध्दट वर्तन करून त्यांना अरेरावीची भाषा वापरून दम देत असताना,फिर्यादी हे समजावुन सांगत असताना,सदर महिलेने माझ्या मुलाचा जामिन झालाच पाहिजे,नाहीतर तुम्हाला बघुन घेईन असे म्हणुन त्यांचे अंगावर धावुन येवुन,इतर मोबाईलधारकाने फिर्यादी यांना फोन करून तुमची तक्रार पालीस आयुक्तांना करतो अशी धमकी देवुन,फिर्यादी यांचे वर आय.ओ. देण्याबाबत दबाव आणुन,त्यांना दमदाटी करून त्यांना अपशब्द वापरले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.आर.स्वामी ९८६०१४७०९५ |

## दि.१८/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १४३/१८,भादविक ४८९(क),३४ |
| **फिर्यादी** | चेतन मोरे, सहा.पोलीस निरीक्षक, सहकारनगर पोलीस स्टेशन |
| **आरोपी** | अविनाश संभाजी चव्हाण,वय-३०,रा.मुं.पो.डोंगरसोनी,ता.तासगाव,जि.सांगली (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०२/२०१८ रोजी मिरज ते राजगुरूनगर व सांगली ते पुणे एस.टी. प्रवासाचे दरम्यान |
| **तपशिल** | यातील नमुद इसम अविनाश संभाजी चव्हाण व त्याचा मित्र प्रविण शिंदे यांनी आपसात संगनमत करून,मिरज ते राजगुरूनगर एस.टी. ने मध्ये बसुन सांगली ते स्वारगेट असा एस. टी.ने प्रवास करीत असताना त्यांनी स्वतः जवळ भारतीय चलनातील ५००/- रूपये दराच्या एकुण ४६ बनावट नोटा जवळ बाळगल्याचे अर्ज चौकशीत निष्पन्न झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.आर.बडे ९८८११२३३४९ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २५३/१८,भादविक ३०२,३२३,३४ |
| **फिर्यादी** | देवा जाधव,वय-३०,रा.बावधन,पुणे |
| **आरोपी** | १.हिरा देवु चव्हाण,वय-३०,रा.लमाणतांडा,संजय गांधी वस्ती,पाषाण,पुणे (अटक) २.विधी संघर्षीत बालक,वय-१७ वर्षे,रा.सदर (ताब्यात नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०१८ रोजी १९/४५ वा. गुंडुभाऊ यांचे चाळीतील खंडोबा मंदिराचे मागे भुंडे वस्ती,बावधन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हिरा चव्हाण हा त्याची जखमी पत्नी सौ.लक्ष्मी हिस मारहाण करीत होता. त्यावेळी मुन्नीबाई देवा जाधव,वय-२५ वर्षे हि सौ.लक्ष्मी हिस वाचविण्यासाठी गेली असताना,यातील नमुद विधीसंघर्षीत बालक याने मुन्नीबाई हिस लोखंडी फुकणीने मारून,हिरा चव्हाण याने तीस जोरात ढकलुन दिल्याने तीचे गालावर व डोक्यावर गंभीर दुखापत होवुन ती मयत झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एम.पगारे |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १३०/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३०७,४२७,मुं.पो.ॲक्ट ३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमी.लॉ.ॲम.१९३२ चे क.७ |
| **फिर्यादी** | राहुल खंडागळे,वय-३३ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण सहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०१८ रोजी २०/३० वा. २७६,बिबवेवाडी ओटा संजय घोडके यांचे घरासमोर |
| **तपशिल** | दि.१६/०५/२०१८ रोजी बापु जानराव व अजय घोडके यांचेत वस्तीमध्ये जोरात गाडी चालविण्याचे कारणावरून भांडणे झाली होती. त्या भांडणा मध्ये अजय घोडके याने बापु जानराव याचा भाऊ धनंजय जानराव याचे डोक्यात कोयत्या सारखे हत्याराने वार करून गंभीर जखमी केले होते. |

फिर्यादी हे नमुद ठिकाणाहुन भाजी घेवुन घरी जात असताना, दि.१६/०५/२०१८ रोजी झालेल्या भांडणाचे कारणावरून नमुद इसमांनी आपले हातात कोयते व फरशी यासारखे हत्यार घेवुन येवुन सदर भागात दहशत निर्माण करून रोडवर पार्क केलेल्या वाहनांचे काचा फोडुन नुकसान करीत असताना,फिर्यादी यांनी त्याचा जाब विचारल्याचे कारणावरून त्यांनी चिडुन जावुन,अमोल जानराव याने फिर्यादीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देवुन,कोयत्याने फिर्यादीचे डोक्यात वार करून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. बी.पी.देवकाते ९८२३०१९५१२

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**